काँग्रेस पक्षाध्यक्षपदासाठी गेहलोत यांचे नाव आघाडीवर

२४ वर्षांनंतर गांधी कुटुंबीयांव्यतिरिक्त अन्य नेत्याच्या निवडीची शक्यता; निवडणूक कार्यक्रमनिश्चितीसाठी रविवारी बैठक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : काँग्रेसचे अध्यक्षपद गांधीतर नेत्याच्या हाती देण्याबाबत पक्षांतर्गत सहमती होऊ लागली असून राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असल्याचे सांगितले जात आहे. काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी मंगळवारी गेहलोत यांच्याशी चर्चा केल्यानंतर नव्या पक्षाध्यक्षाच्या निवडीची प्रक्रिया गतिमान झाली आहे.

काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत निवडणुका पार पडल्या असून आता पक्षाध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. २१ सप्टेंबरपर्यंत नवा पक्षाध्यक्ष निवडला जाणार आहे. या निवडणुकीसाठी २० ऑगस्टपासून प्रक्रिया सुरू झाली असली तरी, माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी अजूनही पक्षाध्यक्षपद स्वीकारण्याची तयारी दाखवलेली नाही. काँग्रेसचा नवा अध्यक्ष गांधीतर असला पाहिजे, या भूमिकेवर राहुल गांधी ठाम असल्याचे काँग्रेसमधील सूत्रांचे म्हणणे आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या काळात काँग्रेसने महागाईविरोधात आंदोलन केले होते. त्या वेळी राहुल गांधींसह काँग्रेसच्या अनेक नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन किंग्जवे येथील पोलीस सभागृहात ठेवले होते. तिथे अनेक काँग्रेस नेत्यांनी राहुल गांधी यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली होती व पक्षाध्यक्षपद स्वीकारण्याचा आग्रह केला होता. मात्र तिथेही राहुल गांधी काँग्रेससाठी आपण काम करत राहू, पण गांधी कुटुंबातील सदस्य पक्षाध्यक्ष न होताही पक्षाला सक्षम करता येईल, अशी भूमिका राहुल गांधी घेतल्याचे समजते. त्यामुळे राहुल गांधी पक्षाध्यक्ष होण्याची शक्यता मावळू लागली असल्याचे काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे.

पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीसंदर्भात २८ ऑगस्ट रोजी कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली असून यामध्ये निवडणुका संपूर्ण कार्यक्रम निश्चित केला जाईल. ही बैठक दूरचित्रसंवादाद्वारे होणार असून तोपर्यंत राहुल गांधी होकार कळवला नाही तर, पक्षाला अधिकृतपणे गांधीतर नेत्याला पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरावे लागेल. राहुल गांधी पक्षाध्यक्ष होण्यास तयार होणार नाहीत, हे गृहीत धरून सोनियांनी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांची भेट घेऊन चर्चा केल्याचे सांगितले जाते.

काँग्रेसच्या अध्यक्षपदी गांधी कुटुंबातील सदस्याची नियुक्ती न करण्याच्या भूमिकेवर राहुल गांधी ठाम असल्याने प्रियंका गांधी-वाड्रा यांचे नावही मागे पडले आहे. शिवाय भाजपकडून काँग्रेसवर सातत्याने घराणेशाहीचा आरोप खोडून काढण्यासाठीही गांधीतर नेत्याची नियुक्ती करावी, असे राहुल गांधी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता अशोक गेहलोत यांचे नाव अध्यक्षपदासाठी आघाडीवर आहे. त्यांच्याशिवाय मल्लिकार्जुन खरगे, कुमारी शैलजा, मुकुल वासनिक यांची नावे काँग्रेसने चर्चेत ठेवली आहे.

पक्षांतर्गत बंडखोर आक्रमक होण्याची शक्यता

काँग्रेसच्या अध्यक्षपदी गांधी कुटुंबातील सदस्याची नियुक्ती होणार नसेल तर, पक्षांतर्गत बंडखोर आक्रमक होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. गुलामनबी आझाद व आनंद शर्मा यांनी अनुक्रमे जम्मू-काश्मीर प्रचार समिती व हिमाचल प्रदेश प्रचार समितीतून अंग काढून घेतले आहे. गांधी कुटुंबाचा उमेदवार म्हणून अशोक गेहलोत यांना मैदानात उतरवले गेले तर बंडखोर 'जी-२३' गटातील नेत्यांपैकी कोणीही गेहलोत यांना आव्हान देण्याचीही शक्यता आहे. या सर्व शक्याशक्यतांवर रविवारी होणाऱ्या कार्यकारणीच्या बैठकीत चर्चा होऊ शकेल, असे सांगितले जाते.

सचिन पायलट मुख्यमंत्री?

सोनियांनी चर्चा केली असली तरी, राजस्थानचे मुख्यमंत्रीपद सोडण्यास अशोक गेहलोत तयार नसल्याचे समजते. राजस्थानच्या सत्तास्पर्धेत सचिन पायलट यांचे बंड गेहलोत यांनी मोडून काढले असले तरी, पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची जबाबदारी सचिन पायलट यांच्याकडे सोपवली जाण्याची शक्यता व्यक्त केली जाते. कदाचित विधानसभा निवडणुकीआधी त्यांच्याकडे मुख्यमंत्रीपदही दिले जाऊ शकते.

शिक्षणसंस्थांमध्ये आता विविध क्षेत्रांतील अनुभवी प्राध्यापक

१० टक्के प्राध्यापक योजनेनुसार भरती

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : कोणत्याही क्षेत्रात पंधरा वर्षे कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तींना आता शिक्षणसंस्थांमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्त करता येणार आहे. यासाठी कोणत्याही किमान शैक्षणिक पात्रतेचे बंधनही असणार नाही. शिक्षणसंस्थेतील एकूण प्राध्यापकांपैकी १० टक्के प्राध्यापक हे या योजनेनुसार घेता येतील.

अभियांत्रिकी, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योजकता, व्यवस्थापन, वाणिज्य, सामाजिक शास्त्र, कला, साहित्य, माध्यम, विधि, संरक्षण, प्रशासन यांसह कोणत्याही क्षेत्रात पंधरा वर्षे कामाचा अनुभव असलेल्या व्यक्तींची आता प्राध्यापक म्हणून थेट नियुक्ती करण्याची मुभा उच्चशिक्षण संस्थांना मिळणार आहे. आयोगाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस' या योजनेला मान्यता देण्यात आली आहे. शिक्षणसंस्थेतील एकूण प्राध्यापकांपैकी १० टक्के प्राध्यापक हे या योजनेनुसार घेता येतील. मात्र संस्थेतील नियमित मंजूर पदे अबाधित राहतील. नियमित प्राध्यापकांची पदे कमी न करता व्यावसायिक अनुभवींची नियुक्ती करता येईल. अध्यापनासह अभ्यासक्रम आराखडा तयार करणे, संस्थेच्या संशोधन प्रकल्पातही हे प्राध्यापक सहभागी होऊ शकतील. किमान १ वर्षे ते कमाल ३ वर्षे या कालावधीसाठी त्यांची नियुक्ती करता येईल. या प्राध्यापकांच्या वेतनाचा किंवा मानधनाचा आर्थिक भार मात्र संस्थांनाच उचलावा लागणार आहे. त्यासाठी पर्याय म्हणून शिक्षणसंस्था एखादी संस्था, उद्योग यांच्याशी भागिदारी करू शकतील.

पुस्तकी शिक्षणापलिकडे प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तींचा अनुभव, कौशल्ये याचा विद्यार्थ्यांना फायदा व्हावा. त्याचप्रमाणे उद्योग किंवा विविध क्षेत्रातील संस्थांनाही त्यांच्या गरजेनुसार कौशल्य विकास झालेले मनुष्यबळ मिळावे यासाठी ही योजना आखण्यात आल्याचे आयोगाने मसुद्यात नमूद केले आहे.

औपचारिक शैक्षणिक पात्रतेची अट नाही

सध्या प्राध्यापक होण्यासाठी पदव्युत्तर पदवी, नंतर नेट किंवा पीएचडी अशी शैक्षणिक पात्रतेची शिडी उमेदवारांना चढावी लागते. मात्र अनुभवाच्या आधारे नियुक्ती करण्यात येणाऱ्या या प्राध्यापकांसाठी कोणत्याही औपचारिक शैक्षणिक पात्रतेचेही बंधन नाही. कामाचा दीर्घ अनुभव असल्यास शैक्षणिक पात्रतेचा विचार न करता प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. संस्थेतील दोन वरिष्ठ प्राध्यापक आणि संबंधित क्षेत्रातील एक तज्ज्ञ यांची समिती आलेल्या शिफारसी किंवा अर्जातून प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस पदासाठी निवड करेल. त्यासाठी संस्था किंवा विद्यापीठातील अधिकार मंडळांची मान्यता असणेही आवश्यक आहे.

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम
बेलापूर भवन, ८वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

स्थापत्य विभाग,
ई-निविदा सूचना

निविदा क्र. नमुंमपा/परि/का.अ(स्था)/०९/२०२२-२३
विषय : नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या आसुडगांव आगारातील अभियांत्रिकी कार्यालयीन अधिकारी व कर्मचारीकरिता कॅबीन बनविणे.
सदर बाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळ https://nmmc.etenders.in व www.nmmc.gov.in यावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

परिवहन व्यवस्थापक
नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम

SICOM LIMITED
सिकॉम लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, इमारत क्र. ४, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३, **दूर. क्र. :** (०२२) ६६५७२७००, **संकेतस्थळ :** www.sicomindia.com

जाहीर ई-लिलाववजा विक्री सूचना दिनांकित १८ जुलै २०२२ रद्द करण्यात आली आहे

कर्जदार/हमीदार/गहाणदार यांच्यासह सर्व जनतेला याद्वारे कळविण्यात येत आहे की, ''बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील, मुंबई शहरचा जिल्हा आणि नोंदणीकरण उपजिल्हामधील गणपतराव कदम मार्ग, वरळी, मुंबई येथील लोअर परळ विभागामधील जमिनीचा धारण केलेला प्लॉट क्र. ५बी आणि ६, कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. २८८ (भाग), १/१५४० (भाग), २/१५४० (भाग) आणि ३/१५४० (भाग)चा भाग असलेल्या ६७०० चौ.मी. मोजमापाच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या 'पलासिस रोयले' नावाने ज्ञात असलेल्या इमारतीमधील ८०० चौ.फू. मोजमापाच्या स्टिल्ट पार्किंग आणि इमारतीमधील २०० चौ.फू. मोजमापाच्या स्टोअर रूमसह ५२व्या (दक्षिण पूर्व) लेव्हल (महानगरपालिका प्राधिकरणाद्वारे संमत करण्यात आलेल्या आराखड्यानुसार ३७वा मजला/ लेव्हल)वरील वापरण्यात येणाऱ्या १३,३७६ चौ.फू. मोजमाप असलेली स्थावर मालमत्ता असलेल्या निवासी सदनिकेचा सर्व खंड आणि भूखंड''च्या गहाण मालमत्तांच्या जाहीर ई-लिलाववजा विक्री जी जुलै १८, २०२२ रोजी 'इकॉनॉमिक टाइम्स' आणि 'लोकसत्ता' (दोन्ही मुंबई आवृत्त्या)मध्ये आणि सिकॉमचे संकेतस्थळ **www.sicomindia.com** आणि **www.auctiontiger.in** वर प्रसिद्ध करण्यात आली होती ती रद्द करण्यात आली आहे. लिलाववजा विक्रीसाठी नवीन कार्यक्रम लवकरच कळविण्यात येईल.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ऑगस्ट २५, २०२२

सही/-
प्राधिकृत अधिकारी, सिकॉम लि.

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)
म्हाडा MHADA

ई-निविदा सुचना

कार्यकारी अभियंता (गोरेगांव)/ मुंबई मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडाचा विभागीय घटक, गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.३३८, दुसरा मजला, कलानगर वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ यांच्या कार्यालयामार्फत खालील कामासाठी मोहरबंद बी-1 (टक्केवारी दर) नमून्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) अनुभवी व पात्र कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. निविदा कागदपत्रे व विस्तृत ई-निविदा सूचना शासनाच्या संकेतस्थळावर **https://mahatenders.gov.in** आणि म्हाडा संकेतस्थळ **https://mhada.gov.in** वर उपलब्ध असतील.

कामाचे नाव: सिद्धार्थनगर गोरेगांव पत्राचाळ येथील म्हाडा पुनर्वसन हिश्यातील सेक्टर आर-३, न.भू.क्र. २२ए/४पै. व २२ए/१२पै. व्हिलेज पहाडी, गोरेगांव (प.), "ए" विंग चे उर्वरीत बांधकाम व "बी" "सी" व "डी" चे उर्वरीत कामे व संरचनात्मक दुरूस्ती (मजबूतीकरण) करणे.

कामाची अंदाजित रक्कम: ₹३८,९१,०९,२५९/- (जी.एस.टी.विरहीत)

अ.क्र.	टप्पा	कालावधी	अ.क्र.	टप्पा	कालावधी
१	निविदा विक्री सुरू	२५.०८.२०२२	२	निविदा विक्री बंद	१९.०९.२०२२
३	तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक	२०.०९.२०२२	४	निविदा पूर्व बैठक	०८.०९.२०२२
				तिसरा मजला, गुलझारीलाल नंदा सभागृह, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई.	

टिप: १. सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. तसेच अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. २. निविदा सूचनेबाबत शुद्धिपत्रक/बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

सही/-
(निलेश मडामे)
कार्यकारी अभियंता /गोरेगांव
मुंबई मंडळ

CPRO/A/501

म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

विश्वासदर्शक ठरावावेळी भाजप आमदारांनी सभात्याग केला.

बिहारमध्ये नव्या सरकारने विश्वासदर्शक ठराव जिंकला

भाजपच्या आमदारांचा घोषणाबाजी करत सभात्याग

पीटीआय, पाटना

बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली नव्याने स्थापन झालेल्या 'महागठबंधन' सरकारने बुधवारी विश्वासदर्शक ठराव जिंकला. भाजपच्या आमदारांनी नव्या सरकारविरोधात घोषणाबाजी करत सभात्याग केला.

एकूण २४३ आमदार असलेल्या बिहार विधानसभेत १६० आमदारांनी नितीश कुमार सरकारच्या बाजूने मतदान केले, तर विरोधकांनी सभात्याग केल्याने विरोधात एकही मत पडले नाही. संसदीय कामकाजमंत्री विजयकुमार चौधरी यांच्या विनंतीवरून उपसभापती महेश्वरी हजारी यांनी मतमोजणी करण्याचे आदेश दिले. आवाजी मतदानाने स्पष्टपणे बहुमताचा पाठिंबा दर्शविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. एमआयएम पक्षाचे एकमेव आमदार असलेले अख्तारूल इमान यांचा पक्ष सत्ताधारी आघाडीचा भाग नसतानाही त्यांनी विश्वासदर्शक ठरावात सरकारच्या बाजूने मतदान केले.

विश्वासदर्शक ठरावापूर्वी भाजपा नेते विजय कुमार यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. सत्ताधारी आमदारांनी कुमार यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडला होता. त्यानंतर उपसभापतींनी सभागृहाचे कामकाज पाहिले.

विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केलेल्या भाषणात केंद्रातील भाजप सरकारवर टीका करण्यात आली. लोकजनशक्ती पक्षाच्या चिराग पासवान यांनी केलेल्या बंडखोरीचा अप्रत्यक्ष उल्लेख केला. त्यांनी आरसीपी सिंह यांच्यामार्फत संयुक्त जनता दलामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. मला कोणतीही वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नाही, असे सांगत विरोधी पक्षांचा पंतप्रधानपदाचे उमेदवार हा भाजपचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. भाजपसोबत आमचे जुने संबंध आहे, असे सांगत सध्याची भाजप ही अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरलीमनोहर जोशी यांच्या काळातील नाही, अशी टीका नितीश कुमार यांनी केली.

तेजस्वी यादव यांची जोरदार टीका

बिहार विधिमंडळाच्या या विशेष अधिवेशनात विश्वासदर्शक ठरावावरील चर्चेत उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "ईडी, सीबीआय आणि प्राप्तीकर विभाग हे सरकारचे तीन जावई आहेत. जे भाजपाला शरण जात नाहीत, त्यांच्यावर या जावायांकडून दबाव आणला जातो", असा आरोप यादव यांनी केला. दरम्यान, बहुमत चाचणीआधी राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांच्या कार्यकाळात झालेल्या कथित नोकरी घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने नेत्यांच्या घरावर छापेमारी सुरू केली आहे.

'सीबीआय'चे राजद नेत्यांवर छापे

नवी दिल्ली, पटना : बिहारमध्ये नवे सरकार विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जात असतानाच बुधवारी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्यांशी संबंधित ठिकाणांवर छापे घातले.त्यात उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्या मालकीच्या कंपनीच्या गुरुग्राममधील बांधकामाधीन मॉलचा समावेश आहे. सीबीआयने दिल्ली, गुरुग्राम, पटना, मधुबनी, कटिहार आदी २५ ठिकाणी छापे घातले.तेजस्वी यादव यांच्याबरोबरच राजद आमदार सुनील सिंह, खासदार अश्फाक करीम, फैयाज अहमद आणि माजी आमदार सुबोध राय यांच्याशी संबंधित ठिकाणांवर छापे घालण्यात आले.

डब्ल्यूआर उधना आणि मडगावदरम्यान अतिरिक्त गणपती विशेष गाड्या चालविणार आहे

गाडी क्र.	मूळ स्थानक आणि गंतव्य स्थान	सेवांचे दिवस	प्रस्थान	आगमन
०९०२०	उधना-मडगाव	२७.०८.२०२२ (शनि) २९.०८.२०२२ (सोम)	१५.२५ वाजता	०९.३० वाजता (दुसऱ्या दिवशी)
०९०१९	मडगाव-उधना	२८.०८.२०२२ (शनि) ३०.०८.२०२२ (मंगळ)	१०.२० वाजता	०५.०० वाजता (दुसऱ्या दिवशी)

थांबे : नवसारी, वलसाड, वापी, पालघर, वसई रोड, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवीम आणि करमाळी स्थानके.

रचना : एसी २-टियर, एसी ३-टियर, शयनयान वर्ग आणि सामान्य द्वितीय श्रेणी

वेळा, थांबे आणि रचनेच्या अधिक तपशिलासाठी प्रवासी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट देऊ शकतात.

गाडी क्र. ०९०२० चे आरक्षण २५ ऑगस्ट २०२२ पासून सर्व पीआरएस काउंटर्स आणि आयआरसीटीसी संकेतस्थळावर सुरू होईल. वरील गाडी विशेष दरांनी विशेष गाडी म्हणून चालविण्यात येईल.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा :
facebook.com/WesternRly
twitter.com/WesternRly

सर्व आरक्षित तिकिटांसाठी मूळ ओळखपत्र सोबत ठेवा.

प्रपत्र जी
स्वारस्य अभिव्यक्तीसाठी निमंत्रण
नादारी आणि दिवाळखोरी (निगम व्यक्तीसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया)
विनियम, २०१६ च्या विनियम ३६ए(१) अंतर्गत

संबंधित तपशिल

१	निगम कर्जदाराचे नाव	स्मार्ट कार्ड आय टी सोल्युशन्स लिमिटेड
२	निगमकर्जदाराच्या प्रस्थापनेची तारीख	२२ मार्च, २०१०
३	प्राधिकरण, ज्या अंतर्गत निगम कर्जदार प्रस्थापित/नोंदणीकृत आहे.	कंपनी अधिनियम १९५६ अन्वये कंपनी प्रबंधक, पुणे, महाराष्ट्र, भारत.
४	निगम कर्जदाराचा निगम ओळख क्रमांक	U22219PN2010PLC135861
५	निगमकर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता	गट ८३७/२, पुणे नगर रोड, गाव सणसवाडी, शिरूर, पुणे, महाराष्ट्र ४१२२०८
६	निगमकर्जदाराच्या नादारी प्रारंभाची तारीख	२० जानेवारी, २०२२
७	स्वारस्य अभिव्यक्तीच्या निमंत्रणाची तारीख	२४ ऑगस्ट २०२२
८	संहितेचे कलम २५(२)(एच)अंतर्गत ठराव अर्जदाराची पात्रता येथे उपलब्ध आहे.	कृपया ठराव व्यावसायिकाशी संपर्क करावा
९	कलम २९ ए अन्वये प्रयोज्य अपात्रतेचेनिकष	नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ चे कलम २९ ए आणि अन्य तरतुदीन्वये
१०	स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकृतीची अंतिम तारीख	१० सप्टेंबर २०२२
११	संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख	१५ सप्टेंबर २०२२
१२	तात्पुरत्या यादीबद्दलच्या तक्रारी सादर करण्याची अंतिम तारीख	२० सप्टेंबर २०२२
१३	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी जारी करण्याची तारीख	२५ सप्टेंबर २०२२
१४	माहिती ज्ञापन, मुल्यांकन मॅट्रीक्स, संभाव्य ठराव अर्जदारांना ठरावयोजनेसाठीविनंती इत्यादी जारी करण्याची अंतिम तारीख	२० सप्टेंबर २०२२
१५	ठरावयोजना, मुल्यांकन मॅट्रीक्स, माहिती ज्ञापन आणि पुढील माहिती इत्यादीसाठी विनंती प्राप्त करण्याची पद्धत	ठराव अर्जदारांनी ठराव व्यावसायिकांशी संवाद साधावा .
१६	ठराव योजना सादर करण्याची अंतिम तारीख	२१ ऑक्टोबर २०२२
१७	ठराव व्यावसायिकांसाठी ठराव योजना सादर करण्याची पद्धत	इलेक्ट्रॉनिक स्वरूपा मध्ये jit1.jain@gmail.com
१८	ठराव आराखडा मंजुरीसाठी निर्णायक प्राधिकरणाकडे सादर करण्याची अंदाजित तारीख	२१ नोव्हेंबर २०२२
१९	ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	जितेंदरकुमार जैन (नोंदणी क्र. आयबीबीआय/ आयपीए - ००२/आय पी-एन ०००३३/२०१६-१७/१००७०)
२०	मंडळ्याकडे नोंदणी केल्याप्रमाणे ठराव व्यावसायिकाचे नाव, पत्ता आणि ई मेल .	जितेंदरकुमार जैन, वकील लेव्हल ९,प्लॅटीना,सी-५९, जी-ब्लॉक, बी के सी, बांद्रा(पूर्व),मुंबई-४०००५१, भारत ईमेल - jit1.jain@gmail.com
२१	ठराव व्यावसायिकाशी पत्रव्यवहार करण्यासाठीवापरावयाचा पत्ता आणि ईमेल.	जितेंदर कुमार जैन, वकील लेव्हल ९,प्लॅटीना,सी-५९, जी-ब्लॉक,बी के सी, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१, भारत ईमेल jit1.jain@gmail.com
२२	पुढील तपशील येथे किंवा सोबत उपलब्ध आहे.	जितेंदर कुमार जैन, ठराव व्यावसायिक
२३	प्रपत्र जी च्या प्रकाशनाची तारीख	२४ ऑगस्ट २०२२

स्मार्ट कार्ड आय टी सोल्युशन्स लिमिटेड करिता
सही/-
जितेंदर कुमार जैन
(नोंदणी क्र. आयबीबीआय/ आयपीए-००२/ आयपी-एन ०००३३/२०१६-१७/१००७०)
ठराव व्यावसायिक लेव्हल ९, प्लॅटीना,सी-५९,
जी-ब्लॉक, बी के सी, बांद्रा (पूर्व),मुंबई - ४०००५१, भारत
ईमेल –jit1.jain@gmail.com

दिनांक: २४ ऑगस्ट, २०२२
ठिकाण: मुंबई, भारत

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण
प्रशासन विभाग

जेएनपीए 01 वर्षाच्या मुदतीसाठी 50 टन क्षमतेच्या दोन हिप्पो क्रेन भाड्याने घेण्यासाठी ई-निविदा मागविण्यास इच्छुक आहे आणि जी आणखी एका वर्षासाठी वाढवता येईल. या बाबतचा तपशिल ई-निविदा वेबसाईट : www:https://eprocure.gov.in/eprocure/app वर किंवा जेएनपीएच्या : www.jnport.gov.in वर निविदे मधिल विक्रेत्यातील व्हेंडर इन्फो सेक्शन मध्ये पाहता येईल.

सी एम (प्रशासन) आणि सचिव

भारत सरकार
भाभा अणू संशोधन केंद्र
आण्विक पुनर्चक्र मंडळ,
आयएनआरपी (ओ), आरॲण्डडब्ल्यूएम, तारापूर

निविदा मागविणारी सूचना

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने महाव्यवस्थापक, आरॲण्डडब्ल्यूएम, आयएनआरपी (ओ), एनआरबी, बीएआरसी, तारापूर यांच्याद्वारा खालील कामाकरिता विहित प्रपत्रात एकेरी बोली पद्धतीत मोहोरबंद बाब दर निविदा मागवीत आहेत.
कामाचे नाव : ''सेंट्रलाइज्ड डेटा मॉनिटरिंग सिस्टम व सीआरपीसी सिस्टमची श्रेणीवाढ.''
एनआयटी क्र.: बीएआरसी (टी)/एनआरबी/आयएनआरपीओ/डब्ल्यूएम/ईॲण्डआय/यूसीडीएक्यू/ एनआयटी/ २०२२/ओपीए- २२७२
अंदाजित खर्च : रु. ९०,००,०००/- (रुपये नव्वद लाख फक्त)
इसारा रक्कम ठेव (इरठे) : रु. १,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार फक्त)
पूर्तता कालावधी : १२ (बारा) कॅलेंडर महिने.

निविदा कागदपत्रांची खरेदी/ डाऊनलोडिंग करण्याकरिता विनंतीकरिता तारखा (एक्सेल/वर्ड फॉरमॅट)	२५.०८.२०२२ रोजी (१८.०० वा.) पासून https://eprocure.gov.in//eprocure/app या वेबसाइटवरून. सविस्तर एनआयटी केवळ पाहण्याकरिता www.barc.gov.in या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.
पूर्व-बोली स्पष्टीकरणाची तारीख	कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या पूर्व-बोली शंका उशिरात उशिरा **०५.०९.२०२२** पर्यंत ईमेलद्वारा पाठवाव्यात. पूर्व-बोली सभा **०७.०९.२०२२** रोजी घेण्यात येणार आहे. पूर्व-बोली स्पष्टीकरणे **१२.०९.२०२२** रोजी **१४.३० वा.**पर्यंत **https://eprocure.gov.in//eprocure/app** या वेबसाइटवर अपलोड करण्यात येणार आहेत.
निविदांच्या ऑनलाइन सादरीकरणाचा कालावधी	**१२.०९.२०२२ (१८.०० वा.) पासून ते २२.०९.२०२२ (१२.३० वा.)**
भाग ''ए''च्या ऑनलाइन उघडण्याची तारीख व वेळ	**२३.०९.२०२२ (१५.०० वा.)**
अर्हताप्राप्त बोलीदारांच्या भाग ''बी''च्या उघडण्याची तारीख	**नंतरच्या तारखेस अधिसूचित करण्यात येणार आहे.**

निविदेचा अधिक तपशील www.barc.gov.in/tenders या बीएआरसीच्या वेबपोर्टलवरून प्राप्त करता येईल.

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.
स्वप्नातील घराकडे नेणारा मार्ग

सीआयएन नं. : एल६५९२२एमएच१९८९पीएलसी०५४५८३
नोंदणीकृत कार्यालय : नॅशनल इन्शुरन्स बिल्डिंग, ६वा मजला, १४, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२० । **फोन नं. :** ०२२-४३०४१९००
ई-मेल : corporate@gichf.com, investors@gichf.com । **वेबसाइट :** www.gichfindia.com

व्हिडीओ कॉन्फरन्स (व्हीसी)/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स (ओएव्हीएम) माध्यमातून घेण्यात यावयाच्या ३२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधी माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की, ३२वी एजीएम बोलाविणाऱ्या सूचनेमध्ये मांडल्याप्रमाणे कामकाज करण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३चे उपबंध व त्याखाली केलेले नियम आणि एमसीएद्वारा निर्गमित ०५ मे २०२२ दिनांकित सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक ०२/२०२२ (यासंदर्भात जारी केलेल्या परिपत्रकाच्या पुढे) आणि सेबी परिपत्रके (एकत्रितरीत्या संबंधित परिपत्रके असे उल्लेखित) यांसोबत वाचावयाचे सेबी (एलओडीआर) रेग्युलेशन्स, २०१५ यांचे अनुपालन करून सामायिक स्थळी सदस्यांच्या वास्तविक उपस्थितीविना व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी')/ अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स ('ओएव्हीएम') माध्यमातून कंपनीच्या सदस्यांची ३२वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम'), शुक्रवार, २३ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्याचे नियोजिले आहे.

संबंधित परिपत्रकांचे अनुपालन करताना ३२व्या एजीएमच्या सूचनेची व वित्तीय वर्ष २०२१-२०२२च्या वार्षिक अहवालाची इलेक्ट्रॉनिक प्रत, ज्यांचे ई-मेल ॲड्रेसिस कंपनीकडे/ डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे नोंदविले आहेत अशा सर्व सदस्यांना पाठविण्यात येईल.

वास्तविक रूपात भाग धारण करणाऱ्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल ॲड्रेस नोंदविण्यासाठी आणि वार्षिक अहवाल, एजीएम सूचना व ई-मतदानाच्या सूचना मिळविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस, मोबाइल नंबर, स्व-साक्षांकित पॅन प्रत आणि भाग प्रमाणपत्राची प्रत देणाऱ्या विनंती पत्राच्या स्वाक्षरीकृत स्कॅण्ड कॉपीसमवेत ई-मेल आयडी einward.irs@kfintech.com वर ई-मेल विनंती पाठवून कंपनीच्या आरटीएकडे- केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ('केफिन') यांच्याकडे आपला ई-मेल ॲड्रेस व मोबाइल नंबर नोंदवावा/ अद्ययावत करावा अथवा पर्यायाने आवश्यक सहपत्रांसमवेत प्रपत्र आयएसआर-१ (आरटीएच्या वेबसाइटवर https://karisma.kfintech.com/ downloads/2Form_ISR-1.pdf) कंपनीच्या आरटीएकडे पाठवून ई-मेल ॲड्रेस व मोबाइल नंबर नोंदवावा/ अद्ययावत करावा. इलेक्ट्रॉनिक रूपात भाग धारण करणाऱ्या सदस्याने ते आपापल्या डीपींकडे पाठवावे.

आरटीए/ डिपॉझिटरींच्या अभिलेखांवर ज्यांचे संपूर्ण कोअर बँक तपशील अद्ययावत केले असतील अशा सदस्यांना लाभांश (एजीएममध्ये घोषित झाल्यास) मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२ रोजी किंवा नंतर थेट प्रदान केला जाईल. कंपनीकडे/ आरटीएंच्या अभिलेखांमध्ये ज्यांचे कोअर बँकिंग तपशील उपलब्ध नसतील अशा सदस्यांना डिमाण्ड ड्राफ्ट्स पाठविले जातील.

३२व्या एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२१-२०२२चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर www.gichfindia.com मध्ये ''इन्व्हेस्टर्स हेड''खालीसुद्धा आणि स्टॉक एक्स्चेंजिसच्या वेबसाइटवर म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com वर व नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडियाच्या www.nseindia.com वरसुद्धा आणि केफिनच्या वेबसाइटवर www.kfintech.com मध्येसुद्धा उपलब्ध करू देण्यात येईल.

३२व्या एजीएमच्या सूचनेमध्ये मांडलेल्या सर्व ठरावांवर आपले मत नोंदविण्यासाठी सर्व सदस्यांना कंपनी दूरस्थ ई-मतदान सुविधा ('दूरस्थ ई-मतदान') पुरवीत आहे. त्याचबरोबर एजीएमदरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारा मतदान करण्याची सुविधा कंपनीकडून पुरविण्यात येत आहे. एजीएममध्ये सहभागी होण्याची आणि दूरस्थ ई-मतदानाची/ ई-मतदानाची सविस्तर पद्धत ३२व्या एजीएमच्या सूचनेत देण्यात आली आहे. व्हीसी/ ओएव्हीएम माध्यमातून एजीएमला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना कंपनी अधिनियम, २०१३च्या कलम १०३ नुसार सदस्यांची किमान गणसंख्या मोजण्याच्या प्रयोजनार्थ गणण्यात येईल.

जीआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नूतन सिंग
ग्रुप हेड आणि कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक :२५.०८.२०२२

PANVEL MUNICIPAL CORPORATION
E-TENDER NOTICE
VEHICLE DEPARTMENT

COMMISSIONER, Panvel Municipal Corporation, Panvel invites quotation tenders through E-tendering system from competent bidders for **"Appointment of service provider for disposing condemned/ Impounded vehicles in Panvel Municipal Corporation region, Maharashtra, India."** The blank forms and the detailed information regarding tenders will be available on the website www.mahatenders.gov.in from 24.08.2022 to 13.09.2022 up to 3.00 PM.

Outward No. PMC/Vehicle/99-22/19/212
Date : 24.08.2022

Sd/-
Additional Commissioner
Panvel Municipal Corporation
Panvel

कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड
सीआयएन: U74999MH1979PLC021942
नोंदणीकृत कार्यालय: वोक्हार्ट टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
टेलिफोन: +९१ २२ २६५३ ४४४४; **फॅक्स:** +९१ २२ २६५२ ३९०५
ई-मेल आयडी: investorrelations@carolinfoservices.com ; **वेबसाइट:** www.carolinfoservices.com

कंपनीची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीसी / ओएव्हीएमद्वारे घेण्याबाबतची माहिती

कळवण्यात येत आहे की **कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड** ('कंपनी') ची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम'/'सभा') गुरुवार, २९ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजता (भारतीय प्रमाण वेळ) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी')/अन्य श्राव्य दृक् माध्यमे ('ओएव्हीएम') द्वारे, कंपन्या कायदा, २०१३ मधील लागू असणाऱ्या तरतुदींनुसार आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार, ज्यांचे वाचन कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या सर्वसाधारण परिपत्रक दि. ५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, ८ डिसेंबर, २०२१, १४ डिसेंबर, २०२१ आणि ५ मे, २०२२, तसेच परिपत्रक दि. ८ एप्रिल, २०२० आणि १३ एप्रिल, २०२० ('एमसीए परिपत्रके') बरोबर करायचे आहे, एजीएम घेण्याबद्दलच्या नोटीशीत नमूद केलेले कामकाज करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

कंपनीने सर्व सभासदांना व्हीसी/ओएव्हीएम आणि इ-मतदान सुविधा पुरविण्यासाठी नॅशनल सेक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') यांची नेमणूक केलेली आहे, ज्याद्वारे ते व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला हजर राहू शकतील आणि एजीएमच्या नोटीशीत नमूद केलेल्या सर्व ठरावांबाबत त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदवू शकतील. जे सभासद एजीएमला हजर असतील आणि ज्यांनी ठरावांबद्दलचे त्यांचे मत रीमोट (दूरस्थ) इ-मतदान सुविधेद्वारे नोंदवलेले नसेल अशा सभासदांना एजीएमदरम्यान इ-मतदानाची सुविधा पुरवली जाईल. ज्या सभासदांनी एजीएमपूर्वी रीमोट (दूरस्थ) इ-मतदानाद्वारे त्यांचे मत नोंदवलेले असेल ते व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात परंतु त्यांना त्यांचे मत पुन्हा नोंदवता येणार नाही. इ-मतदानाबद्दलची माहिती व पद्धत एजीएमच्या नोटीशीत दिली जाईल.

कृपया नोंद घ्यावी की कंपनीच्या ४२ व्या एजीएममध्ये प्रत्यक्ष हजर राहण्यासाठी व सहभाग घेण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे व्हीसी सुविधेद्वारे / ओएव्हीएमद्वारे सभेला हजर राहणाऱ्या सभासदांना कंपन्या कायदा, २०१३ च्या कलम १०३ खाली गणसंख्या (कोरम) पूर्ण होण्याकरता मोजले जाईल.

ज्या सभासदांचे इमेल पत्ते कंपनीकडे/रजिस्ट्रारकडे आणि ट्रान्स्फर एजंट ('रजिस्ट्रार')/ डिपॉझिटरीजकडे नोंदवलेले आहेत अशा सभासदांनाच एजीएमची नोटीस व त्यासोबत आर्थिक वर्ष २१-२२ चा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवले जाईल. वरील कागदपत्रांची प्रत कंपनीच्या वेबसाइटवर www.carolinfoservices.com येथे आणि एनएसडीएलच्या वेबसाइटवर www.evoting.nsdl.com येथेही उपलब्ध असेल. एमसीए परिपत्रकांच्या पालनानुसार, एजीएम नोटीशीच्या आणि वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष प्रती कोणत्याही सभासदांना पाठवल्या जाणार नाहीत. त्यामुळे, ज्या सभासदांनी त्यांचे इमेल पत्ते नोंदवलेले नाहीत त्यांना विनंती आहे की त्यांनी एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल व त्यासोबत मतदानाबद्दलच्या सूचना, रीमोट (दूरस्थ) मतदानासाठी आणि त्यांचे मत नोंदवण्यासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी, investorrelations@carolinfoservices.com येथे २ सप्टेंबर, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज पत्र पाठवून ते अद्ययावत करावेत व त्यासोबत पुढील माहिती जोडावी-नाव (सर्व धारकांची नावे), फोलिओ क्रमांक /डीपीआयडी, क्लाएंट आयडी, मोबाइल क्रमांक, निवासी पत्ता (त्यासोबत पत्त्याच्या पुराव्याची स्वयंप्रमाणित प्रत जोडावी), पॅन कार्डाची (सर्व धारकांच्या) स्वयंप्रमाणित प्रत.

ही नोटीस एमसीएच्या लागू असलेल्या परिपत्रकांच्या पालनानुसार कंपनीच्या सभासदांच्या लाभासाठी पाठवण्यात येत आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
कॅरोल इन्फो सर्विसेस लिमिटेड साठी
सही / -
स्टीफन डिसोझा
एमडी व सीएफओ

तारीख : २४ ऑगस्ट, २०२२
ठिकाण : मुंबई